**महाराष्ट्र शासन**
**उपवनसंरक्षक, कार्यालय, अमरावती वनविभाग,**
अमरावती कॅम्प, अमरावती - 444602
**दूरध्वानी क्र.0721-2662814 (वैय.) 2550144**
**ई-मेल-dcfamravati@mahaforest.nic.in** dcfamtdn१४@gmail.com

क्रमांक:कक्ष-1/शिली-1/मावर/ /2025-26 अमरावती, दिनांक-20.06.2025

# मानद वन्यजीव रक्षक म्हणुन महिलांची नियुक्ती करणे बाबत.
# जाहीरात

उपवनसंरक्षक, (प्रा.) अमरावती वनविभाग,अमरावती यांचे मार्फत अमरावती जिल्हयाकरीता वन्यजीव संरक्षणार्थ वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 मधील कलम -4 मध्ये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार शासनामार्फत **महिला मानद वन्यजीव रक्षकाची नियुक्ती** करावयाची आहे. नियुक्तीसाठी पात्र उमेदवाराकडुन केवळ अमरावती वनविभागाचे Email ID - dcfamtdn14@gmail.com या ई-मेल आयडी वर अर्ज मागविण्यात येत आहे. अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावी.

1.0 **ओळखपत्र**
2.0 **कायमचा पत्ता याबाबतचा पुरवा**
3.0 **वन्यजीव संरक्षण, संवर्धन, मानव-वन्यजीव संघर्ष तसेच निसर्गात संकटग्रस्त, नामशेष होत चाललेल्या प्रजातीचे संवर्धन, संरक्षण इ.बाबत केलेल्या कामाचा तपशिल.**

वरील जाहीरातीचे अनुषंगाने याव्दारा सुचित करण्यात येते की, वनसंरक्षण व वनसंवर्धनाचे काम करणा-या, मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्याचे काम करणा-या महिला उमेदवारांची वाढती संख्या विचारात घेवुन प्रत्येकाला वन्यजीव संरक्षणार्थ **महिला मानद वन्यजीव रक्षक** म्हणुन काम करण्याची संधी उपलब्ध व्हावी यासाठी **"महिला मानद वन्यजीव रक्षक"** या पदाकरीता वन्यजीव संरक्षणार्थ केलेल्या कामासंबधात स्वतंत्र प्रस्तावासह अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| 1 | उपवनसंरक्षक, (प्रा.) अमरावती वनविभाग,अमरावती या कार्यालयाचे dcfamtdn14@gmail.com या ई-मेल आयडी वर अर्ज स्विकारण्याचा कालावधी | दिनांक 26 जुन 2025 रोजी सांयकाळी 05.00 वाजेपावेतो. |
| 2 | उपवनसंरक्षक, (प्रा.) अमरावती वनविभाग,अमरावती यांचे मार्फत प्राप्त अर्जाची छाननी करणे | दिनांक 27 जुन 2025 ते 3 जुलै 2025 |
| 3 | अंतीम अहवाल मा.मुख्य वनसंरक्षक (प्रा.) अमरावती यांना सादर करणे. | दिनांक 04 जुलै 2025 |

टिप : 1. आवश्यकतेनुसार वरील वेळापत्रकात बदल झाल्यास त्याबाबत वेळोवेळी https://mahaforest.gov.in या संकेतस्थळावर सुचना प्रसिध्द करण्यात येईल. अशा सुचनांचे वेळोवेळी अवलोकन करण्यांची उमेदवारांनी दक्षता घ्यावयाची आहे.

2. उमेदवारांनी प्रस्ताव सादर करतांना ओळखपत्र व कायमचा पत्ता याबाबत पुरावा जोडणे बंधनकारक आहे.

प्रस्तुत जाहीरात ही संक्षिप्त जाहीरात असुन, अर्ज स्विकारण्याची पध्दत, अर्हता, निवडीची प्रक्रीया याबाबचा सविस्तर तपशिल https://mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्याचे कृपया अवलोकन करावे. उमेदवारांना कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसुन वरील संकेतस्थळावर आवश्यक माहिती वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

## अटी व शर्ती

1. महिला उमेदवारास वन्यजीव सवंर्धनाची आवड असणे आवश्यक आहे.
2. निसर्गाच्या आणि वन्यजीव संवर्धनाच्या हिताला हानी पोहोचविणा-या कोणत्याही अपराधी कृत्यात सहभागी नसलेली महिला.
3. वन्यजीवांच्या व्यावसायीक शोषणात सहभागी असलेला कोणत्याही व्यक्तीचा विचार केला जाणार नाही.
4. वन व वन्यजीव विभागाचे यंत्रणेला मदत करण्याची क्षमता असणे आवश्यक आहे.
5. स्थानिक समुदायाशी संवाद साधुन त्यांना वन्यजीव संरक्षण व संवर्धनाचा संदेश पोहोचविण्यात सक्षम असणारी महिला.

वरील अटीच्या अधीन राहुन सादर करावयाचे प्रस्ताव दिनांक 27.06.2025 रोजी सायंकाळी 06.00 वाजेपर्यन्त उपवनसंरक्षक (प्रा.) अमरावती वनविभाग,अमरावती , गर्ल्स हॉयस्कुल चौक, कॅम्प रोड, अमरावती या ठिकाणी स्वत: किंवा टपालाने तीन प्रतित सादर करावेत. तसेच प्रस्तावाची सॉफ्ट कॉपी dcfamtdn14@gmail.com या ई मेल आयडी वर सादर करावी.

(धैर्यशिल पाटील)
उपवनसंरक्षक
अमरावती वनविभाग,अमरावती